महावितरण

# जाहीर निवेदन

महाराष्ट्र राज्य, वि.वि.कं. मर्या. अमरावती ग्रामीण विभागा अंतर्गत सत्र २०२३-२०२४ करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची आहे, गुणवत्तेनुसार निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांना अमरावती ग्रामीण विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये म्हणजेच १) अमरावती तालुका, २) भातकुली तालुका, ३) चांदूर रेल्वे तालुका, ४) धामणगांव रेल्वें तालुका, ५) नांदगांव खंडेश्वर तालुका व ६) तिवसा तालुका येथे प्रशिक्षणासाठी दिले जाईल. शिकाऊ उमेदवारांची पदसंख्या - विजतंत्री (Electrician) ३२, तारतंत्री (Lineman)- ३२ व कोपा-पासा- ५ एकुण ६९शैक्षणिक अर्हता - १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्य माध्यमिक शिक्षण मंडळ १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उतीर्ण असणे आवश्यक, २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री व कोपा/पासा व्यवसायात उतीर्ण झालेला असावा अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ MSBTE या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रिशन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामुळे विजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार शुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येईल. अटी व शर्ती: (१) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारासाठी किमान १८ वर्ष पुर्ण व कमाल ३० वर्ष असावे. राखीव उमेदवाराकरीता वयाची अट ०५ वर्ष शिथीलक्षम राहील. त्याकरीता उमेदवाराने राखीव गटातील जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (२) केवळ अमरावती जिल्हातील रहीवाशी असलेल्या (आधार कार्डवरील पत्ता अमरावती जिल्ह्यामधील असावा) उमेदवारांचाच प्रशिक्षणासाठी विचार केला जाईल. (३) अमरावती जिल्ह्याच्या व्यतिरिक्त इतर जिल्हातील अर्जाचा विचार केला जाणार नाही. (४) प्रशिक्षण कालावधी ०१वर्ष असेल. (५) विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल. (६) ऑनलाईन अर्ज करतांना एस.एस.सी. उतीर्ण गुणपत्रिकामध्ये नमुद केलेले नांव व जन्मतारीख हे आधार कार्डवर नमुद असलेल्या नावाशी व जन्मतारखेशी सुसंगत असावे. तसेच सद्यास्थितीत कार्यान्वित असलेला ई-मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अचूक नमुद करावा. (७) संगणक प्रणालीमार्फत केलेल्या अर्जाची प्रत व आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्र व चारही सेमिस्टर गुणपत्रिका स्व:साक्षांकित करून या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. (८) इच्छुक पात्र उमेदवारांनी https://apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज जाहितरातीच्या दिनांकापासून ते दि. १२.१२.२०२३ पर्यंत या कार्यालयाचा आस्थपना क्र. E10162702274 यावरच योग्य व परिपुर्ण माहितीसह प्रविष्ट करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. (९) ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत, शैक्षणिक मुळ कागदपत्रे व आधारकार्ड कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, अमरावती ग्रामीण विभाग मेजर स्टोअर संकुल पॉवर हाऊस, वेलकम पॉईन्ट, अमरावती मोर्शी रोड, अमरावती येथे दि. १९/१२/२०२३ ते दि. २१/१२/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत अर्ज स्वत: सादर करणे आवश्यक, (१०) शिकाऊ उमेदवार यांची निवड आय.टी.आय.चे गुण विचारात घेऊन केवळ गुणवत्तेनुसार निवड यादी तयार करुन शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यात येईल, (११) उपरोक्त संकेत स्थळावर या विभागाशी संबंधीत आस्थापना क्रमांक E10162702274 च्या व्यतिरिक्त दुसऱ्या आस्थापना क्रमांकावर भरलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाही, (१२) जाहिरातील अंशत: बदल किंवा संपुर्ण जाहीतरात रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखुन ठेवीत आहे.

कार्यकारी अभियंता

पी.आर.ओ.नं.९० म.रा.वि.वि. कं मर्या. अमरावती ग्रामीण विभाग